पूर्णम इकोव्हीजन फाऊंडेशन

पूर्णमिदं

VOLUME 2 ISSUE II

MARCH-APRIL 2020

अनुक्रमणिका

संपादकीय	१
पूर्णमचे मदतकार्य	२
फोटो गॅलरी	३-४
वनस्पती व आपले आरोग्य	५
वसुंधरा दिन	६
महिला सक्षमीकरणाची वाटचाल	७-८
पूर्णमच्या कामाबद्दल प्रतिक्रिया	८-९

संपादकीय

सादर नमस्कार, या वर्षातील दुसरा म्हणजेच मार्च-एप्रिल महिन्याचा अंक प्रकाशित करीत आहोत.

मार्च महिना दिनविशेष म्हटले की सर्वप्रथम महिला दिन आठवतो. हीच बाब लक्षात घेऊन आम्ही या अंकात महिलांनी लिहिलेले लेख समाविष्ट केले आहेत. भारतीय स्त्री शक्ती जागरण संस्थेच्या मृणालिनीताई दातार यांनी महिला सबलीकरण याबद्दल आपले मत मांडले आहे.

७ एप्रिल हा आरोग्य दिन म्हणून जगभरात ओळखला जातो. सध्याच्या COVID-19 उद्रेकाच्या काळात आरोग्य उत्तम राखण्याचे महत्व काही वेगळे सांगणे आवश्यक नाही. आपल्या भारत देशात परंपरेने चालत आलेला आयुर्वेद प्रतिकारशक्ती चांगली ठेवण्यासाठी मार्गदर्शन करतो.

जैवविविधतेचे जतन करणे हे आपले सगळ्यांचे कर्तव्य आहे. जैवविविधतेची कमतरता विविध साथीच्या रोगास कारणीभूत ठरते, असे मत शास्त्रज्ञांनी मांडले आहे. वनस्पती हा जैवविविधतेतील एक घटक आहे, त्याचे संवर्धन करणे याविषयी डॉ. सौ. निवेदिताताई घायाळ यांचा लेख या अंकात समाविष्ट केला आहे. महिला सबलीकरण आणि पर्यावरणाची गरज ओळखून पूर्णम इकोव्हिजन नेहमीच कार्यरत असते.

सध्या आवश्यक असणाऱ्या मास्कची निर्मिती करणे आणि social distancing पाळून त्याचे वाटप करणे हे काम संस्था करत आहे. आतापर्यंत साधारण ३१००० मास्क संस्थेच्या माध्यमातून देण्यात आले आहेत, अजूनही देत आहोतच. यासाठी पूर्णम समवेत सेवावर्धिनी, स्वानंद जनकल्याण प्रतिष्ठान, सुराज्य सर्वांगीण विकास प्रकल्प, रोटरी क्लब इत्यादी स्वयंसेवी संस्था हातभार लावत आहेत. यासंबंधीची विस्तृत माहिती या अंकात देत आहोत.

याशिवाय संस्थेच्या 'पूर्णाहूती' या निधी संकलन प्रकल्पासही आपण सगळ्यांनी उत्तम हातभार लावला याबद्दल आम्ही पूर्णम परिवारातर्फे आपणांस धन्यवाद देतो. 'पूर्णाहूती' हा असा प्रकल्प आहे कि ज्या अंतर्गत आपणांस आयकारात ८० जी अंतर्गत सवलत मिळते. आम्ही परिवारातर्फे असे आवाहन करतो की रोज किमान रु. १ जमा करून आपण सर्वांनीच पूर्णाहूती प्रकल्पात सहभागी व्हावे.

२२ एप्रिल हा वसुंधरा दिन आपल्याला ज्ञात आहेच. साईशोभा इंग्लिश मिडीयम शाळा ,धायरी येथील शाळकरी विद्यार्थ्यांनी लिहिलेला उत्कृष्ट लेख नवीन पिढीतील पर्यावरण प्रेम व जतन करण्याची जाणीव करून देणारा असा लेख आहे.

इथे हे ही नमूद करावेसे वाटते की अगदी इयत्ता १ ली पासून विद्यार्थ्यांनी लिहिलेले लेख आमच्याकडे पाठवावेत. शिक्षक पालकांनी त्यांना योग्य ते मार्गदर्शन करावे. आम्हाला ते लेख प्रकाशित करताना नक्कीच आनंद आणि अभिमान वाटेल..
वाचनासाठी शुभेच्छा!!

- ***सौ. राखी कुलकर्णी***
संपादिका

कोरोनाशी लढण्यासाठी पूर्णमचे मदत कार्य

मार्च महिन्यापासून सर्वच देशांमध्ये कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागला. भारतामध्येही या आजाराने शिरकाव केला आणि पुणे जिल्ह्यात कोरोनाचे म्हणता म्हणता ६०० हून जास्त रुग्ण २० एप्रिलपर्यंत आढळून आले. मार्चच्या मध्यानंतर केंद्र सरकारने देशभर लॉकडाऊन घोषित झाले. अजूनही आपण लॉकडाऊनमध्ये आहोत.

या संकटाच्या काळात सर्वत्र मास्क वापरणे सामान्य नागरिकांसाठीही अनिवार्य झाले. याचा परिणाम म्हणून मास्क जास्त प्रमाणात निर्माण होण्याची व मुबलक प्रमाणात उपलब्ध असण्याची गरज निर्माण झाली. पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन तर्फे महिलांच्या माध्यमातून दुपदरी कापडी मास्क बनवायला सुरुवात केली गेली. तयार झालेले मास्क विविध स्वयंसेवी संस्थांमार्फत वितरीत केले जाऊ लागले. आत्तापर्यंत ३९००० हून अधिक मास्क बनविले गेले आहेत व ३१००० मास्क वितरीत झाले आहेत.

१६ एप्रिल रोजी रेल्वेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून रेल्वे कामगारांना वापरण्यासाठी विभागीय रेल्वे व्यवस्थापनाकडे ७५०० मास्क पूर्णमतर्फे दिले गेले. आणखी विशेष गोष्ट म्हणजे ११० महिलांनी आत्तापर्यंत या उपक्रमामध्ये सहभाग घेतला आहे आणि यांपैकी बऱ्याच महिला स्वयंसेवी भावनेतून हातभार लावत आहेत. मास्क वितरीत करण्याच्या कार्यात २० स्वयंसेवक सहभाग घेत आहेत.

आजाराबरोबरच आणखी एक समस्या सर्वत्र आढळून येत आहे. ती म्हणजे मास्क व हँडग्लोव्जचा कचरा म्हणजेच बायोमेडिकल कचरा उघड्यावर अथवा रस्त्यावर तसेच नाला-नदीच्या कडेला टाकला जाणे. यासंदर्भात जनजागृती आवश्यक आहे. पूर्णमकडून या संदर्भात जनजागृतीपर माहिती पोस्टर स्वरूपात पोहोचवली जात आहे. आत्तापर्यंत २०००० लोकांपर्यंत ही जनजागृती पोहोचली आहे.

विभागीय रेल्वे व्यवस्थापनाला मास्क देताना संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मणेरीकर

फोटो गॅलरी





मास्क उपलब्ध करून देण्यासंदर्भातील पोस्टर

मास्क बनविताना महिला

फोटो गॅलरी

जनजागृती विषयक पोस्टर



कोव्हीड-१९ मदत कार्यासंदर्भात

वनस्पती आणि आपले आरोग्य

मनुष्यप्राण्याचे जीवन आणि त्यातील वनस्पतींचे स्थान असा जर विचार केला तर असं लक्षात येतं की त्याचे संपूर्ण आयुष्य वनस्पतींशी निगडीत आहे. बारश्यापासून ते बाराव्यापर्यंत एकही प्रसंग वनस्पतींशिवाय त्याच्या आयुष्यात घडत नाही. किंबहुना त्याची शारीरिक, मानसिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जडणघडण ही वनस्पतींच्या हजेरीशिवाय होऊच शकत नाही. आपली जगन्माता पृथ्वी आणि सर्व प्राणीमात्र यांचा प्रमुख जीवनस्त्रोत ह्या वनस्पती आहेत, याचे प्रमुख कारण म्हणजे त्यांच्याकडे असलेली प्रकाशसंश्लेषणाची अभूतपूर्व ताकद होय. ह्या एकमेवाद्वितीय अशा अफाट शक्तीमुळे ही झाडे प्रचंड मोठी, भरपूर आणि वैविध्यपूर्ण अशी वनसंपदा निर्माण करू शकतात. प्रचंड महाकाय वृक्ष, नाजूक फुलांनी डवरलेल्या वेली, राक्षसी वेली, सुगंधी फुलझाडे, अतिशय मोहक फळझाडे, लांबवर पसरलेली लुसलुशीत गवताळ कुरणे या सर्वांमुळे ते आपल्या वसुंधरेचे नंदनवन बनवतात, तिचे यजमानपद मिळवतात आणि आपल्याला पाहुणे बनवतात. या वानसविश्वामध्ये असलेल्या विविध क्षमतांचा विचार केला तर आपल्याला आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. अन्न, वस्त्र व निवारा यांसारख्या मूलभूत गरजा भागविण्याबरोबरच या वनस्पती इतरही काही गुणधर्म दाखवतात, उदा. जमिनीचा पोत सुधारणे/घटवणे, भरपूर पाणी साठवणे, संवेदनशीलता इ. वनस्पतींच्या अशा बहुविध उपयोगांमधील एक महत्वाचा उपयोग म्हणजे त्यांचे औषधी उपयोग आहेत, ज्यांचा आपल्या आरोग्याशी घनिष्ट संबंध आहे. माणसाचे आरोग्य म्हटले की प्रामुख्याने दोन गोष्टींचा विचार करावा लागतो- १) सातत्याने निरोगी शरीर मजबूत ठेवणे व त्यासाठी विविध वनस्पतींचा वापर २) आपल्याला एखादा आजार/रोग/व्याधी असताना त्यातून पूर्णपणे बाहेर पडण्याकरिता वनस्पतींचा, त्यांच्या काही औषध प्रकारांचा वापर करणे. वरील दोन्ही गोष्टींत वनस्पतींचा वापर टाळता न येणारा आहे.
"अमंत्रम् अक्षरं नास्ति" या श्लोकातील "नास्ति मूलं अनौषधम्" इ आयुर्वेदातील महावाक्य म्हणूनच तर मान्यता पावले आहे. वैद्य व डॉक्टर लोकांचा व्यवसायाधार झाला आहे.

प्रस्तुत लेखात आपल्या सर्वांगीण आरोग्यासाठी आवश्यक वनस्पतींचा वापर कसा करता येऊ शकतो ते पाहूया. पहिल्या प्रकारात आपले निरामय निरोगी आयुष्य राखण्याकरता कोणत्या वनस्पतींचा उपयोग होतो त्यांचा विचार करूया. उदा. शतावरी, गुळवेल, लिंबू, तुळस, गवती चहा, आले, ओवा, बदाम, हळद, लसूण इत्यादी. अशा अनेक वनस्पतींचा वापर आपण त्यांचे भाग पौष्टिक म्हणून, शरीराला ताकद देणाऱ्या म्हणून वापरू शकतो. जसे वाळवून, चूर्ण करून, गोळ्या/वटी बनवून, आसव किंवा अरिष्ट तयार करून इ. वनस्पतींचा दुसऱ्या प्रकारातील वापर हा अतिशय जास्त प्रमाणात तो म्हणजे माणसाला आजार झाल्यावर. व्याधियुक्त शरीरापासून लवकर मुक्ती मिळवण्याकरिता आपण वनस्पतींचा वापर हरतऱ्हेने करतो. यादी द्यायची झाली तर पाने अपुरी पडतील, पण "आजीबाईचा बटवा", "स्वयंपाकघरातील औषधी" किंवा "धन्वंतरी घरच्याघरी" अशी काही शीर्षके अपुरी ठरवीत. वनस्पतींमधील विविध औषधी तत्त्वे वापरून आजार बरा करण्याचे शास्त्र म्हणजे आयुर्वेद, ज्याला पाचवा वेद मानलं जातं, ते खरं असावं असं वाटतं कारण विषाणूंना दूर ठेवण्यासाठीच्या युक्त्या हे शास्त्र सांगतंय. उदा.- रोज हळद व गरम पाण्याच्या गुळण्या करा, भीमसेनी कापूर, तुळस, ओवा, पुदिना, बडीशेप हिंग, धूप, गुग्गुळ यांचा घरात धूर करा जो विषाणूंना तुमच्यापासून दूर ठेवेल. आपले आरोग्य ह्या वनस्पतीविश्वाशी असे घट्टपणे निगडीत आहे. तेव्हा चला त्याच्यासाठी तरी जंगलतोड थांबवूया, वनांचे रक्षण करूया तरच आपल्या पुढील पिढ्या येथे आनंदाने नांदू शकतील.

-डॉ.सौ.निवेदिता अ. घायाळ
वनस्पतीशास्त्र विभाग
आबासाहेब गरवारे कॉलेज, पुणे-४

वसुंधरा दिन

वसुंधरा दिन हा पर्यावरणविषयक कार्यक्रमांना पाठबळ देण्याचा पाया आहे. त्यामुळे पर्यावरण संवर्धनाच्या सार्वजनिक वचनबद्धतेला संजीवनी मिळते. हा दिन साजरा करण्यामुळे जगभर व्यापक वैविध्यपूर्ण कार्यक्रम आणि उपक्रम राबविण्यासाठी सामाजिक चालना मिळते. भिन्न पार्श्वभूमी, श्रद्धा, विश्वास आणि राष्ट्रीयत्व असलेले जगभरातील सर्व लोक हा दिन साजरा करतात. यामधून समाज विकास आणि पर्यावरण संरक्षण कार्यक्रमांद्वारे काम करणाऱ्या हजारो कार्यकर्त्यांशी वर्षभर समन्वय साधला जातो. जागतिक पातळीवर पर्यावरणवादी कार्यकर्ते पृथ्वीच्या संवर्धनासाठी झटत असतात.

गेल्या ५० वर्षांपासून २२ एप्रिल हा दिवस 'वसुंधरा दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. १९७० च्या दशकातील आधुनिक पर्यावरण चळवळीचा जन्म हा दिन साजरा करण्यातूनच झाला असे अनेक जण मानतात. त्या काळात वाहनांतून वातावरणामध्ये सोडला जाणारा धूर मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण करत असे. त्याचप्रमाणे कारखान्यांतून अनिर्बंधपणे वातावरणात विषारी आणि कसल्याही प्रक्रियेशिवाय रसायन-मिश्रित पाणी आसपासच्या परिसरात सोडले जात असे. त्यांना कायद्याची किंवा माध्यमांची भीती नव्हती. लोकांकडून आणि औद्योगिक क्षेत्राकडून होणारे जल-वायू प्रदूषण याकडे 'समृद्धीचे प्रतिक' म्हणून पहिले जात असे.

प्रदूषणाला खरेतर मान्यताच प्राप्त झाली होती. पर्यावरणविषयक चिंता अमेरिकेच्या मुख्य प्रवाहाच्या गावीही नव्हती. मात्र सन १९६२ मध्ये राचेल कार्सन लिखित 'सायलेंट स्प्रिंग' हे पुस्तक न्यूयॉर्क टाईम्सने प्रकाशित केले आणि उत्तम खप झालेल्या या पुस्तकाने बदलाची नांदी घडवून आणली. १९७० मध्ये वसुंधरा दिन साजरा करण्याची कल्पना पुढे आली. ही वसुंधरा दिनाची कल्पना सर्वप्रथम गेलोर्ड नेल्सन यांनी मांडली.

सन १९६९ मध्ये कॅलिफोर्नियामध्ये सांता बार्बरा येथे प्रचंड प्रमाणात तेलगळती झाली. त्याच्या निषेधार्थ जनतेने मोठ्या प्रमाणात केलेई नासधूस आणि लुटालूट नेल्सन यांनी पहिली होती. विद्यार्थ्यांच्या याच उर्जेचा जल आणि वायू प्रदूषणाच्या विरोधात जनजागृती करण्यासाठी नेल्सन यांनी उपयोग केला व पर्यावरण रक्षणाचा मुद्दा राष्ट्रीय राजकीय कार्यक्रमपत्रिकेवर घेणे सरकारला भाग पाडले. यासंदर्भात कार्यक्रम करण्यासाठी ८५ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. परिणामी पर्यावरणाच्या नासाडी विरोधात यावेळी झालेल्या निदर्शनांमध्ये दोन कोटींहून अधिक अमेरिकन्स सहभागी झाले. हजारो महाविद्यालयांनी आणि विद्यापीठांनी निषेधात्मक कार्यक्रम सादर केले.

सन १९९० पर्यन्त हा दिवस मर्यादित प्रांतांत साजरा करण्यात येत होता. पण १९९० साली पर्यावरणवादी नेत्यांनी 'वसुंधरा दिन' जागतिक स्तरावर आणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. या मोहिमेतून १४१ देशांमधून २० कोटी लोकांनी सहभाग घेतला. १९९० च्या वसुंधरा दिनी 'वस्तूंच्या पुनर्वापरास चालना' हा विषय मांडला गेला.नेल्सन यांच्या 'वसुंधरा दिन' या कल्पनेमुळे आणि त्यात त्यांच्या योगदानामुळे त्यांना अमेरिकेचा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'प्रेसिडेन्शियल मेडल' प्रदान करण्यात आले.

वसुंधरा दिनी १९७० पासून दर १० वर्षांनी नवीन मोहीम हाती घेतली जाते व प्रचंड जन-समूह एकवटतो. वसुंधरा ही आपली माता आहे व आपण तिचे रक्षण, संवर्धन करायलाच हवे. जर आपण तिची काळजी घेतली तरच ती आपली काळजी घेईल.

- जॉय पाटील, अथर्व मिरजकर

साईशोभा इंग्लिश मिडीयम स्कूल

धायरी

महिला सक्षमीकरणाची वाटचाल

१९७५ चे महिला वर्ष व त्यानंतरच्या महिला दशकापासून महिला सबलीकरण, सक्षमीकरण किंवा women empowerment हे शब्द आपल्या परिचयाचे झाले.महिला सक्षमीकरण करण्याची गरज जाणवू लागली कारण समाजाचा अर्धा भाग असलेल्या महिलांचे कुटुंबातील, समाजातील स्थान पुरुषांच्या तुलनेत दुय्यम होते. कुटुंब, समाजरथाचे एक चाक कमकुवत होते. त्यासाठी पितृसत्ताकता, अनिष्ट रूढी परंपरांची समाजावर असलेली घट्ट पकड यासारख्या अनेक बाबी कारणीभूत होत्या. परिणामस्वरूप आरोग्याची हेळसांड, शिक्षण, नोकरी-व्यवसायाच्या संधींचा तसेच निर्णय घेण्याच्या, समाजात वावरण्याच्या संधीचा अभाव असणारे अभावग्रस्त, प्रसंगी अत्याचारग्रस्त, वडील, पती, मुलगा अशा पुरुषांवर अवलंबित आयुष्य जगणाऱ्या सर्वसामान्य स्त्रिया सक्षम नसणे स्वाभाविक होते. खुद्द स्त्रियांनाही त्याची जाणीव नव्हती, काही गैर वाटत नव्हते. काही मोजक्या स्त्रियांचा अपवाद वगळता सर्वसामान्य स्त्रिया असे आयुष्य वर्षानुवर्षे जगत होत्या.

स्त्रियांचे सक्षम नसणे खुद्द त्यांच्यासाठी, कुटुंबासाठी, समाजासाठी आणि देशासाठीही हानिकारक होते याची जाणीव या महिला दशकाच्या काळात प्रकर्षाने होऊ लागली होती. आपल्या देशात स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक पुरुष समाजसुधारकांनी स्त्रियांची परिस्थिती बदलण्यासाठी पुढाकार घेतल्याचा इतिहास आहे. तरीही या काळात अनेक राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय महिला परिषदा, स्त्रियांच्या स्थितीबद्दलचे, प्रश्नांबद्दलचे अभ्यास, स्त्री संघटनांचा उदय, सरकारचा सहभाग यामुळे स्त्री-सक्षमीकरणाच्या प्रक्रियेस चालना मिळाली हेही खरे! त्यामुळे आज परिस्थिती थोडी बदललेली दिसत आहे. स्त्रियांचे शिक्षण घेण्याचे, नोकरी-व्यवसाय करण्याचे प्रमाण लक्षणीयरित्या बदलले आहे. स्त्रियांना कोणतेच क्षेत्र वर्ज्य नाही. त्या कर्तृत्व गाजवत आहेत.परंतु हि चित्राची उजळ बाजू आहे. देशातील सर्व ठिकाणच्या, सर्व स्तरातल्या स्त्री समूहाचा विचार करता पूर्ण उजळ होण्यासाठी खूप प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सक्षम स्त्रीची डोळ्यासमोर येणारी प्रतिमा म्हणजे आरोग्यसंपन्न, मनाप्रमाणे शिक्षण घेतलेली, आवडीच्या क्षेत्रात काम करणारी, आत्मविश्वासाने समाजात वावरणारी, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी, स्वतः संदर्भातील निर्णय घेतानाच कौटुंबिक तसेच कार्यक्षेत्रातील निर्णय घेण्यात अग्रेसर असणारी, स्वतःचे प्रश्न सोडविण्यात पुढाकार घेणारी, आत्मसन्मान असलेली स्त्री! जी आज काही प्रमाणात आपल्याला भेटत आहे. परंतु हे सहज घडलेले नाही. या प्रवासात अनेक अडथळे, समस्या आहेत. अत्याचाराच्या नवनवीन प्रकारांना तिला सामोरे जावे लागत आहे. परंतु स्त्री संघटना, सरकार आणि ती स्वतः अशा सामूहिक प्रयत्नांतून तिला हा पल्ला गाठता आला आहे.

स्त्री संघटनांनी आजवर केलेले व आजही त्या करीत असलेले मोठे काम म्हणजे खुद्द स्त्रियांचे आत्मभान जागृत करणे! पुरुषांप्रमाणे तूही एक सामान्य, स्वतंत्र व्यक्ती आहेस. तू कमकुवत नाहीस, तुझ्याकडे बुद्धी आहे, क्षमता आहेत. त्या ओळख, संधी शोध, त्यांचा उपयोग करून घे. हिंमतीने निर्णय घे. हे तू करू शकतेस. हा विश्वास देण्याचे, त्यांचा आत्मविश्वास वाढविण्याचे काम त्यांनी केले व आजही करीत आहेत. विविध विषयांवर भाषणे, परिसंवाद, चर्चा तसेच आरोग्यविषयक शिबिरे, कार्यशाळा, स्त्रियांचे प्रश्न सोडविण्यासाठी समुपदेशन केंद्र, कायदेविषयक कार्यशाळा यांसारख्या अनेक उपक्रमांच्या माध्यमातून स्त्रियांच्या विकासाला हातभार लागतोय तसेच समस्या सोडविण्यासाठी मदत मिळत आहे.

एक उपक्रम स्त्रीला विविध प्रकारे सक्षम करत आहे तो म्हणजे स्वयंसहाय्यता बचत गट! आमच्या सत्रे शक्ती जागरणसह अनेक संघटना, संस्था, शासकीय संस्थाही हा उपक्रम राबवित आहेत. बचत गटांनी केलेल्या सामूहिक बचतीतून नाममात्र व्याजाने कर्जवाटप हे त्याचे वैशिष्ट्य! बचतीची सवय, आर्थिक गरजा भागविल्या जाणे, नवीन व्यवसाय सुरु करणे (वैयक्तिक/सामूहिक) व आधीपासून करीत असलेल्या व्यवसायास बळ मिळणे, बँकांचे व्यवहार करण्याची सवय होणे, गटाच्या कामकाजात निर्णय घेणे यासारख्या अनेक बाबी एकाच वेळी साध्य होत आहेत!

हे सर्व करीत असताना पुरुषांचा स्त्रियांविषयीचा, स्त्री प्रश्नांकडे पाहण्याचा बदलण्याचे, पुरुष प्रबोधनाचे कार्यही स्त्री

महिला सक्षमीकरणाची वाटचाल

संघटनांनी आवर्जून हाती घेतले आहे. स्त्री संघटनांचे अत्यंत महत्त्वाचे कार्य म्हणजे जागरूक स्त्रियांचा दबावगट निर्माण करून विविध सुधारणांसाठी, कायदे केले जाण्यासाठी- त्यात सुधारणांसाठी, विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सरकारकडे आग्रही मागण्या करणे, पाठपुरावा करणे. सरकारचा सकारात्मक प्रतिसाद व इच्छाशक्ती ही अत्यंत महत्वाची बाब आहे. स्त्री विषयक धोरण आखणे, वेळोवेळी सुधारणा करणे, स्त्रियांसाठी विविध क्षेत्रात संधी निर्माण करणे. स्त्री विकासासाठी सहाय्यभूत होतील अशा आरोग्य, शिक्षण, रोजगार विषयक विविध योजना आखणे, स्त्रियांच्या समस्या सोडविण्यासाठी,त्यांच्यावरील अत्याचारांना प्रतिबंध व्हावा यासाठी विविध प्रकारे कायदे करणे हे केंद्र, राज्य सरकारकडून अपेक्षित असते.

भारतात स्त्री संघटना, केंद्र, राज्य सरकारे आणि समाज - यात पुरुष वर्गही आलाच- यांच्या संयुक्त प्रयत्नातून स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल जोमाने सुरु आहे आणि राहील!

स्वविकासाबरोबरच सक्षम स्त्रीचे योगदान कुटुंब, समाज व देशविकासासाठीही वाढेल हे निश्चित!

मृणालिनी दातार
भारतीय स्त्री-शक्ती जागरण संस्था
पुणे

पूर्णमच्या कामाबद्दल प्रतिक्रिया

आनंदक्षण (लर्निंग स्पेस) ही संस्था २०१३ साली सुरु झाली. मुलांचे शिकणे हे आनंददायी, प्रयोगशील, कृतिशील असावे असा मुख्य उद्देश. तसेच आनंदक्षण दर वर्षी गट १ ते १० या वयोगटातील मुलांसाठी एका प्रकल्पाचे नियोजन करते, ज्यात शक्य तो सर्व विषयांचा समावेश असेल. अशाच एका प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन या संस्थेची ओळख झाली. प्रकल्पाचे काम सुरु असतांना आपल्या मुलांमध्ये ही जागरूकता यावी म्हणून आनंदक्षण ही वेगवेगळे प्रयोग करत होते.

फेब्रुवारी २०२० या वर्षी, पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन आणि कमिन्स यांच्या संयुक्त विद्यमाने एक प्रयोग राबवण्यात आला ज्यात आनंदक्षणला सहभागी होता आले. शाळाशाळांमधून जी स्पर्धा घडवून आणायची होती ती आमच्या इथेही झाली. हे काम साकारताना, पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन मधील स्वयंसेवकाने येऊन मुलांना इ-कचरा यावर मार्गदर्शन केले. मग चित्रकलेची स्पर्धा झाली व शेवटी इ-कचरा पासून बनवलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व अंतर शालेय स्पर्धा २२ फेब्रुवारीला झाली.

अशा उपक्रमामुळे मुलांमध्ये जागरूकता येणे व त्या दृष्टीने विचार करणे व पावले उचलणे हे मार्गदर्शन मिळते. वस्तूंच्या प्रदर्शनातून सर्व मुलांना इतरांचे काम बघण्याची संधी मिळाली तसेच स्वतःचे विचार कृतीत आणता येतात याचा आत्मविश्वास आला. यासाठी पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन आणि कमिन्स यांचे आभार ! असे वेगवेगळे प्रयोग दर वर्षी व्हावेत जेणेकरून मुलांमधील सर्जनशीलतेला वाव मिळू शकेल.

एक शिक्षिका म्हणून मला असेही वाटते की पुढच्या नियोजनाच्या वेळेस मुलांशी अजून खोल व सखोल संवाद व्हायला हवा. मुलांनी कोणत्या बाबींवर विचार करावा, कोणत्या गोष्टी अवलंबल्या पाहिजेत यासंबंधी दिशादर्शन मिळावे, जेणे करून मुलांकडूनही तितकेच लक्ष केंद्रित करून काम होऊ शकेल.

आनंदक्षणला ही संधी दिल्याबद्दल पूर्णम इकोव्हिजन फाऊंडेशन आणि कमिन्स यांचे पुनश्च आभार.!!

-शाल्मली जोशी
आनंदक्षण (लर्निंग स्पेस)

पूर्णमच्या कामाबद्दल प्रतिक्रिया

आपण आपला संकुचित दृष्टीकोन ठेवून जगात वावरत असताना समाजातल्या उणीवा, दोष तर दिसत राहतात पण त्यासाठी आपण काही करू शकू असं त्यावेळी वाटत नाही. मात्र जे अधिक आपलेपणाने समाजाशी समरस होतात त्यांना त्यावरचे उपाय सापडतात आणि अशी जाणीवा विकसित झालेली माणसे, त्या समस्यांवरचे उपाय कार्यान्वितही करतात. आजूबाजूला अशी अफाट कामे उभी राहिलेली बघितली की थक्क व्हायला होतं. इतक्या विविध प्रकारे आपणही समाजाचं देणं चुकवू शकतो हे कळून चुकतं. अशीच एक संस्था म्हणजे पूर्णम इकोव्हिजन!

वसुंधरा दिन ह्या विशेष दिवशी पूर्णमची माहिती आपल्याला असायलाच हवी. पुणे आणि आजूबाजूच्या भागांमधून पूर्णम संस्था आपल्या वेगवेगळ्या केंद्रांमार्फत प्लास्टिक तसेच इलेक्ट्रोनिक कचरा गोळा करते. शहरभरात अनेक भागांमध्ये दर रविवारी ही केंद्रे नियमितपणे रहिवाशांकडून इ कचरा घेऊन त्याची सुरक्षित विल्हेवाट लावतात तसेच रिसायकल करतात.

कचरा व्यवस्थापनाचाच आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सॅनिटरी नॅपकिन्सचा कचरा. तो प्रश्न आहे कारण त्याचे विघटन होत नाही. असा कचरा महानगरपालिकेकडून गोळा केला जाणाऱ्या कचऱ्यात एकत्र न होऊ देता पूर्णम संस्था शाळा, सोसायट्या, होस्टेल्स अशा ठिकाणांहून सॅनिटरी नॅपकिन्स स्वतंत्र गोळा करते आणि मशीन्सद्वारे पूर्ण विल्हेवाट लावते. अनेक प्रभागांमध्ये अशी इनसीनिरेशन मशीन्स आहेत आणि रोज सुमारे ३००० पेक्षा जास्त सॅनिटरी नॅपकिन्सचा हा कचरा नष्ट केला जातो. अशा प्रकल्पाद्वारे रोजगार निर्मितीही होत आहे.

संस्थेचा तिसरा प्रकल्प म्हणजे जुन्या कपड्यांचे रिसायकल. जुने कपडे अनेकदा उत्तम असूनही टाकून दिले जातात. ज्यांचा पुनर्वापर होऊ शकतो. पूर्णम संस्था असे जुने कपडे गोळा करते. महिलांना शिवणकामाचे तसेच कलाकुसरीचे प्रशिक्षण देते. अशा महिला ह्या कापडापासून उत्तमोत्तम कलात्मक पर्सेस, गोधड्या, पायपुसणी, फोल्डर्स, रजई बनवतात आणि अनेक प्रदर्शने तसेच इतर मार्गांनी त्यांची विक्री केली जाते. सामान्य माणसासाठी जुन्या कपड्यांपासून तयार केलेल्या वस्तू ह्या स्वस्त दरात उपलब्ध होण्याबरोबरच ज्या पदार्थाच्या निर्मितीला अनेक नैसर्गिक संसाधने खर्च झालेली असतात त्यांची पुनर्वापरामुळे बचत करणे हा खूप महत्त्वाचा उद्देश त्यामागे आहे.

ह्या तीनही प्रकल्पांमध्ये प्रशिक्षणे देऊन कार्यकर्ते तसेच व्यावसायिक निर्माण केले जातात. औद्योगिक कचरा व्यवस्थापन, प्रदूषण नियंत्रण असे मोठे उपाय तर शासकीय पातळीवर होत असतातच पण स्थानिक पातळीवर अनेक प्रश्न असतात. जसे की खरोखर जुन्या कपड्यांचे काय करायचे वा घरातील जुन्या मोबाईल फोन्स, इअर फोन्स, सीडीज अशा अनेक गोष्टींचे काय करायचे, त्या कुठे फेकून द्यायच्या हे खरोखर कळत नाही. अशा समस्या ओळखून त्यावर काम करणे ह्यासाठी खरोखर तशा जाणीवा असायला लागतात आणि त्या प्रत्यक्ष समाजात मिसळून गेल्यामुळेच विकसित होतात.

सध्याच्या काळात कोरोना मुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी लढण्यासाठी आपापल्या परीने अनेक संस्था बरेच काम करत आहेत. पुढचे अनेक महिने आपल्याला मास्क लागणार आहेत आणि त्याचा तुटवडाही आत्ताच दिसत आहे. त्याचसाठी पूर्णमने धुवून परत वापरता येण्यासारखे मास्क बनवले आहेत. ते १००% कॉटनचे आहेत व घरगुती वापरासाठी थोड्या संख्येने तसेच कंपन्यांच्या कर्मचाऱ्यांसाठी मोठ्या प्रमाणावरही बनवून मिळू शकतात. आज या संस्थेत सामाजिक अंतराचे (social distancing) नियम पाळून ७० महिला, २० स्वयंसेवक काम करत आहेत. दररोज 2000 मास्क बनतात.

पर्यावरण क्षेत्रात पीएचडी मिळवलेले श्री. राजेश मणेरीकर हे ह्या संस्थेचे संस्थापक आहेत. समाजाची गरज लक्षात घेऊन तत्काळ पावले उचलून आपल्या परिक्षेत्रात काम करणारी अशी माणसं ह्या वैश्विक साथीच्या कठीण काळातही समाजात आसपास आहेत म्हणून निर्धास्त वाटतं. मात्र तेवढ्यावरच न थांबता आपणही एखाद्या सेवाकार्याचा एक भाग होऊ शकतो. अशा एखाद्या प्रकल्पामध्ये आपण अगदी सहज सहभागी होऊ शकतो. इ वेस्ट कलेक्शन सेंटर सुरु करणे वा वस्तू विक्रीसाठी सहयोग, प्रशिक्षणे देणे, कपड्यांच्या वस्तूंसाठी नव्या कल्पना राबविणे अशा कितीतरी कामांमध्ये आपण सहज मदत करू शकतो. पर्यावरण क्षेत्रात काम करण्याची इच्छा असलेल्यांनी संस्थेला आणि प्रकल्पांना भेट देण्याबरोबरच www.poornamecovision.org ह्या साईटलाही जरूर भेट द्या. तसेच मास्क हवे असल्यास 9075005385 या नंबरवर संपर्क करा.

- ॲडव्होकेट विभावरी बिडवे

सहयोगी संस्था

पूर्णम इकोव्हीजन फाउंडेशन

सर्व्हे नं ५, “मातोश्री” बंगला, चिन्मय कॉलनी, जनसेवा मेडिकलची गल्ली, कर्वेनगर, पुणे- ५२

संपर्क क्रमांक- ०२०-२५४७३७५७, इ-मेल- contact@poornamecovision.org

वेबसाईट- www.poornamecovision.org